**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 12.09.2025** **वार- शुक्रवार**

---

**<u>लष्कर चर्चासत्र</u>**

जगभरात आर्थिक संरक्षणवाद आणि स्पर्धात्मक लोकप्रियतावाद वाढत असताना आता भारताने सॉफ्टपॉवर सह हार्ड पॉवर दाखवण्याची वेळ आली आहे, अशी ठाम भूमिका संरक्षण सचिव राजेशकुमार सिंग यांनी मांडली.
लष्कराच्या दक्षिण विभागातर्फे आयोजित stride या चर्चासत्रात ते बोलत होते. उद्योग, शैक्षणिक संस्था आणि लष्कराच्या सहकार्यातून आत्मनिर्भरता ही या चर्चासत्राची संकल्पना आहे.

**<u>हाफकिन संस्था आढावा</u>**

हाफकिन संस्थेच्या बळकटीकरणासाठी 150 कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून संस्थेच्या अडचणी दूर करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून सकारात्मक मार्ग काढला जाईल, असं आश्वासन अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिलं.
पिंपरी-चिंचवड येथील हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ प्रकल्पास भेट देऊन तेथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

## इंदापूर विकासकामे

इंदापूर तालुक्यातील विविध विकास कामांबाबत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. या बैठकीत इंदापूर तालुक्यात सुरू असलेल्या आणि प्रस्तावित असलेल्या विकास प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

इंदापूर तालुक्यातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन स्थानिक पातळीवर कामे जलदगतीने करण्यावर भर देण्याचे निर्देश भरणे यांनी यावेळी दिले.

## ईको टुरिझम

पुणे जिल्ह्यातील इको टुरिझमला चालना देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला असून, त्यानुसार जिल्ह्यातील सुमारे 15 पर्यटन स्थळांवर मूलभूत सुविधां उपलब्ध करून देण्यासाठी 60 कोटी रुपयांच्या निधीतून विकासकामे करण्यात येणार आहेत.

यामध्ये प्रामुख्याने वन्यजीव अभयारण्य, धबधबे, किल्ले, लेणी अशी गर्दी असणाऱ्या ठिकाणांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. विकास कामांमुळे येथील पर्यटनाला चालना मिळणार असून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहेत.

## कर सवलत

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागामार्फत, विशेष कर सवलत जाहीर करण्यात आली आहे. महापालिकेने येत्या 30 सप्टेंबर पूर्वी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना चालू वर्षाच्या सामान्य करावर थेट 4 टक्के सवलत देऊ केली आहे. जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी या सवलतीचा

लाभ घ्यावा, असं आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात आलं आहे.

**<u>महाआरोग्य शिबिर</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे सांगवी गावठाण इथं आज मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आलं होतं. या शिबिरात 350 हून अधिक नागरिकांनी विविध तपासण्यांचा लाभ घेतला तर 100हून अधिक नागरिकांना आयुष्मान कार्ड आणि आभा कार्ड तयार करून देण्यात आलं.

या शिबिरामध्ये विविध प्रकारच्या तपासण्यासह लहान मुलांचे लसीकरण, औषध वितरण अशा सर्व सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

**<u>नवरात्र बस सेवा</u>**

एसटीच्या पुणे विभागाकडून येत्या नवरात्र उत्सवात साडेतीन शक्तीपीठ विशेष बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही बस 27 सप्टेंबर रोजी सकाळी 7 वाजता पिंपरी-चिंचवड आगारातून सुटेल. शिवाजीनगर-कोल्हापूर-तुळजापूर-माहुरगड-सप्तश्रृंगीगड असा प्रवास करून पिंपरी-चिंचवड येथे परतणार आहे. त्याचबरोबर शिवाजीनगर वाकडेवाडी ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान दर अर्ध्या तासाला वातानुकुलित ई-बसच्या फेऱ्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याचे ऑनलाईन आरक्षण संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**<u>बांधकाम कारवाई</u>**

पुणे महापालिकेने नगर रोड, औंध- बाणेर, धनकवडी-सहकारनगर, हडपसर-मुंढवा, कसबा-विश्रामबागवाडा या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीमधील रस्ते आणि पदपथावरील अनधिकृत स्टॉल, रस्ता रुंदीतील आजूबाजूच्या राखीव जागांवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली. या कारवाईत एकंदर 37,200 चौरस फूट क्षेत्रातील बांधकाम पाडण्यात आलं.

**<u>जनजागृती मोहीम</u>**

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी उद्या कँडल मार्चचं आयोजन करण्यात आलं आहे. आत्महत्या प्रतिबंधासाठी गेल्या वीस वर्षांपासून कार्यरत असलेल्या कनेक्टिंग ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ पुणे सारसबाग यांच्या पुढाकारातून हा कँडल मार्च उद्या सायंकाळी 6 वाजता संभाजी उद्यान, जंगली महाराज रस्ता येथून निघणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 29 तर किमान तापमान 21 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. संध्याकाळी काही ठिकाणी माध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. उद्याही तापमान साधारण असंच असेल, तसंच दुपारनंतर हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**